# बिरूयामधील लोक देवाच्या वचनाचा अभ्यास करून ते आचरणात आणायला शिकले, त्याप्रमाणे देवाच्या वचनाचा शोध करा

मुलांना शिकविणाऱ्यांनी B2b अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** ''हे आमच्या स्वर्गातील बापा, तुझ्या वचनाचा अर्थ अचूक उलगडून सांगण्यास आणि ते आमच्या अंत:करणात साठवून ठेवण्यास साहाय्य कर.''



सध्याच्या गरजा व रीतीरिवाजांना अनुरूप कार्यक्रम निवडा.

1. **देवाच्या वचनाने तुमच्या अंत:करणाची व मनाची तयारी करा**

**प्रे. कृ. 17:10-12** मध्ये बिरूयामधील लोकांनी शुभवर्तमानाला कोणत्या दोन प्रकारे प्रतिसाद दिला ते पाहा.

**1 पेत्र 1:14-22** मध्ये देवाच्या सत्याद्वारे आमच्या जीवनात कोणत्या गोष्टी घडल्या पाहिजेत ते पाहा.

**1 पेत्र 1:24-25** मध्ये देवाचे वचन आमच्यामध्ये किती काळ वास्तव्य करणार ते पाहा.


**2 तीमथ्य 3:10-17** मध्ये पौलाने तीमथ्याला काय लिहिले ते पाहा.

- पौलाच्या जीवनातील कोणत्या गोष्टींच्याद्वारे तीमथ्याला बहुमोल मार्गदर्शन मिळाले? (पाहा वचने 10-13)
- येशूवरील विश्वासाने आपले तारण झाले आहे अशी खात्री देणारी कोणती गोष्ट तीमथ्याला त्याच्या लहानपणापासून माहीत होती? (पाहा वचने 14-15)
- पवित्र शास्त्राच्या लेखकांना कोणी प्रेरणा दिली? (पाहा वचन 16)
- इतरांना मदत करण्यासाठी आम्ही कोणत्या प्रकारे पवित्र शास्त्राचा उपयोग केला पाहिजे? (पुन्हा पाहा वचन 16)
- आम्ही देवाच्या वचनाचा अभ्यास करून ते आचरणात आणावे यामागे त्याचा काय हेतू आहे? (पाहा वचन 17)

तरुण पाळकवर्गासाठीची अनेक कामे 2 तीमथ्य 4:1-5 मध्ये पाहा. पाहा वचने 2 व 5

2. **सहकाऱ्यांशी चर्चा करून आठवड्यातील कार्यक्रमांची योजना आखा.**

- विश्वासणाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांना पवित्र शास्त्राचा अभ्यास स्वत: करण्यासाठी मदत करा. उदाहरणार्थ
- मंडळीतील लहान गट व कुटुंबांना पवित्र शास्त्राचा अभ्यास एकत्रितपणे करण्यासाठी साहाय्य करा.
- आपल्या अभ्यासातून काय शिकायला मिळाले हे एकमेकांना विचारण्यास विश्वासणाऱ्यांना प्रोत्साहन द्या.
- विश्वासणाऱ्यांनी प्रत्येक आठवड्यात शास्त्रलेखातील काही वचने पाठ करावीत यासाठी मदत करा.




### 3. सहकाऱ्यांशी चर्चा करून पुढील उपासनेच्या वेळेची योजना आखा.

**देवाने त्याच्या पवित्र** आत्म्याच्या सामर्थ्याने आपल्या वचनाच्या द्वारे बोलावे आणि आम्ही ऐकलेल्या गोष्टी तत्काळ आचरणात आणाव्यात यासाठी आमचे साहाय्य करावे. याकरिता प्रार्थना करा.

**वाचा** प्रे. कृ. 17:10-12

- प्रथम, प्रत्येकाला काळजीपूर्वक ऐकायला सांगून बिरूयातील लोकांनी कशाप्रकारे शुभवर्तमानाला प्रतिसाद दिला हे शोधण्यास सांगा.
- आम्ही देखील बिरूयातील लोकांप्रमाणे देवाच्या वचनाचा मोठ्या आस्थेने शोध घेतला पाहिजे, हे स्पष्ट करा.

आम्ही केवळ निष्क्रियपणे न ऐकता सक्रियपणे त्यातील सोने वेचून घेतले पाहिजे. अम्ही स्वत: हून पुढाकार घेऊन वचनाचा उत्सुकतेने शोध घेण्यास सुरुवात केली पाहिजे. यामध्ये साहाय्य होण्यासाठी पुढे काही पायऱ्या दिल्या आहेत:

पवित्र शास्त्राला स्वत:च आमच्याशी कसे बोलू द्यावे हे स्पष्ट करा. मार्गदर्शनासाठी प्रार्थना केल्यानंतर चार गोष्टी करा:

1) पवित्र शास्त्रातील उताऱ्याचा तपशील पाहा, प्रत्येक शब्द व शब्द समुह विचारात घ्या.

2) अर्थ सुस्पष्ट नसेल तर, उताऱ्याचा संदर्भ आणि ठिकाण लक्षात घ्या:

- तो कोणाला उद्देशून लिहिला आहे?
- तो कोणी व का लिहिला?
- याचा अर्थ स्पष्ट होईल असे अगोदर व नंतर येणारी वचने वा अध्याय यामध्ये काय म्हटले आहे?
- तो कधी लिहिण्यात आला?

  समजा तो ख्रिस्त येण्यापूर्वी जुन्या करारात, लिहिलेला असेल तर मग तुमच्या नव्या कराराच्या मंडळीला लागू होणार नाही; पण, प्राचीन इस्राएलासाठी नियम त्यात असतील, हे अपेक्षित आहे)
- या उताऱ्यामध्ये देव आम्हाला काय करायला सांगत आहे?

**महत्वाचे:**

3) या तपशीलातून मुख्य सत्ये व आचरणात आणण्याच्या गोष्टींचे सार काढा.

4) तुम्हाला समजलेल्या गोष्टी आचरणात आणा.

आम्हाला पवित्र शास्त्र दिले याबद्दल देवाची स्तुती करा.

देवाच्या वचनाचा अभ्यास करतांना कसे आशीर्वाद मिळाले याबद्दल विश्वासणाऱ्यांना साक्ष व अहवाल देण्यास सांगा.

## पवित्र शास्त्राचा अर्थ उलगडून सांगण्याविषयीचे नाटुकले

**श्री. परंपरा:** 'श्री नव विश्वासणारे' पवित्र शास्त्र वाचत आहेत. ते काही क्षण पाहा. मग त्याच्या हातातून ते ओढून घेऊन म्हणा, ''तुम्ही स्वत: शास्त्रलेख वाचून तुम्हाला ते समजणार नाहीत. त्याऐवजी येथे असलेली काही आधुनिक पुस्तके वाचा.''

**श्री. नव विश्वासणारे:** तुमच्या खिशातून आणखी एक पवित्र शास्त्र काढून म्हणा, ''तुमची पुस्तके तुमच्या जवळच राहू द्या. देवाच्या वचनाचा अभ्यास, पाठांतर व आज्ञापालन करून ते मी माझ्या अंत:करणात जपून ठेविले आहे. म्हणूनच पवित्र आत्मा पवित्र शास्त्राचा उपयोग करून मला जीवन देतो हे मला माहीत आहे. अन्य कोणत्याही पुस्तकातून ते मिळत नाही.''

**श्री. परंपरा:** ''प्राचीन कागदपत्रांचा अर्थ उलगडून सांगण्याच्या आधुनिक पद्धतींचा अभ्यास केलेल्या पाळकांनाच फक्त ते समजेल.''

**श्री. नव विश्वासणारे:** ''आम्ही प्रार्थना करून अर्थाचा उलगडा करणारे काही साधे नियम पाळले, तर देवाचे वचन कोणाही विश्वासणाऱ्याला समजते. आमच्या गटाच्या पाळकांनी आम्हाला शिकविले आहे.''


मुलांनी तयार केलेली कविता व नाटिका त्यांना सादर करण्यास सांगा. मुलांना त्यांनी तयार केलेले त्यांच्या नाटिकेवर आधारित प्रश्न प्रौढांना विचारता येतील.

कुटुंबे व लहान गटांनी आठवड्यामध्ये पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी तुम्ही आखलेल्या योजना जाहीर करा.

तीन जणांचे गट करा आणि एकमेकांना मदत करा. प्रार्थना करा, योजना आखा आणि एकमेकांना प्रोत्साहन द्या.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी, निर्गम 12 वचने 3,7-8 व 12 वाचा, पहिल्या वल्हांडणाचे थोडक्यात वर्णन करा आणि येशूने ह्या अत्यंत पवित्र विधीची स्थापना केली तेव्हा त्याने याला नवा अर्थ दिला हे स्पष्ट करून सांगा. पातक आणि मरण यापासून आमची सुटका व्हावी म्हणून देवाच्या कोकऱ्याचे अर्पण करण्यात आले.

**पाठ करा** 2 तीमथ्य 3:16-17



Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net